## निशाण क्र.९९ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.१ याने नि.क्र.८० वरील पारित झालेल्या आदेशाबाबत पुनर्रविचार करणेसाठी दाखल केला आहे. त्याच्या म्हणण्यानुसार वादीने नि.क्र.८० च्या अर्जान्वये दावा मिळकतीमधील तोडलेल्या झाडांची गोलाई, उंची वगैरे मोजमापे घेवून सदरच्या झाडांचा लिलाव करण्यासाठी वनपाल यांना आदेश होणेसाठी वादीने विनंती केली होती. सदर अर्ज मंजूर झाला आहे. वनपाल यांनी वादी यास सदरची झाडे जंगलात व झाडेझुडपात असल्यामुळे मोजमापे घेता आली नाहीत, ते दावा मिळकतीच्या ठिकाणी येवून मोजमापे घेणार आहेत, सदर लाकडांच्या सभोवतालचे झाडीझुडपे, गवत साफ करून मोजमापे घेताना अडथळा येणार नाही याची दक्षता घ्यावी, मोजमापे घेण्यास अडथळा झाल्यास व मोजमापे घेता न आल्यास आपण सर्वस्वी जबाबदार रहाल असे कळविले आहे. मात्र, वादीने सदर सुचनेकडे जाणुनबुजून दुर्लक्ष केले आहे. वादीने दावा मिळकतीमध्ये झाडाझुडपांची साफसफाई न केल्यामुळे वनपाल यांना तोडलेल्या लाकुड सामानाची मोजमापे घेता आली नाहीत. यावरून वादी यास या लिलाव प्रक्रियेमध्ये रस नाही. केवळ प्रकरण जास्ती जास्त लांबवता येईल व सदरचे लाकुड सामान पावसामुळे कुजून जाईल व प्रतिवादी क्र.१ चे आर्थिक नुकसान होईल हे वादी पहात आहे. वादी हा स्वत:च्या स्वार्थासाठी न्यायालयाचा अमुल्य वेळ खर्ची करत आहे. सबब, नि.क्र.८० चा अर्ज रद्द करावा, अशी विनंती प्रस्तुत प्रतिवादीने केली आहे.

२. वादीने सदर अर्जावर म्हणणे दाखल करून सदर अर्ज खोटा व खोडसाळ आहे असे नमूद केले आहे. त्याने हा अर्ज फेटाळणेची विनंती केली आहे.

३. वादीतर्फे विद्वान विधिज्ञ व प्रतिवादी क्र.१ चा युक्तिवाद ऐकण्यात आला

४. नि.क्र.८० वरील आदेशान्वये वादी याच्या विनंतीनुसार वनपाल, देवगड यांनी दावा मिळकतीतील झाडांची पाहणी करून त्यांची मोजमापे घेवून त्या झाडांची लिलावाद्वारे विक्री करावी व विक्री किंमत न्यायालयात जमा करावी, त्याबाबतचा पंचनामा करावा व तसा अहवाल याकामी सादर करावा असे आदेश देण्यात आले आहेत. परिमंडळ वन अधिकारी, देवगड यांनी नि.क्र.९७ ला असलेल्या अहवालामध्ये सदर लाकडांभोवती सभोवतालची झाडेझुडपे व गवत साफ करण्यासाठी व मोजमापे घेताना अडथळा होणार नाही याची दक्षता घेण्यासाठी वादी, प्रतिवादी यांस याबाबत कळविले होते असे दिसून येते. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ४७ नियम १ नुसार सदर आदेशामध्ये काही दोष असल्यास किंवा त्या अर्जाच्या सुनावणी नंतर नवीन व महत्वाची बाब किंवा पुरावा आढळून आल्यास सदर आदेशाबाबत पुनर्विलोकन करता येते. मात्र, नि.क्र.८० च्या आदेशामध्ये अशा प्रकारचा कोणताही दोष असल्याचे दिसून येत नाही किंवा एखादी नवीन व महत्वाची बाब किंवा पुरावा नंतर मिळून आल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे प्रतिवादी क्र.१ ने अर्जात नमूद केलेल्या कारणास्तव प्रस्तुत आदेशाचे पुनर्विलोकन करता येणार नाही असे मला वाटते. सबब, प्रस्तुतचा अर्ज फेटाळणेस पात्र आहे. परिणामी मी खालील आदेश पारित करीत आहे:

## आदेश

१. अर्ज फेटाळणेत येतो.

२. खर्चाबाबत आदेश नाही.

सही/—
( गि.सु.माने )
दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवगड.

देवगड
दिनांक २९/११/२०१७